भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ )

जा.क्र.२५२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०७/०४/२०१७

१) घराचे समोरील दाराचा कुलुप तोडुन सोन्याचे, चांदीचे दागीने व नगदी पैश्याची चोरी. :—

दिनांक ०६/०४/२०१७ चे ०६.१५ वा. दरम्यान यातिल फिर्यादी ही आपले पतिला औषधोपचार करणे कामी नागपुरला घेवुन गेली होती. फिर्यादी ही आपले घरी भंडारा येथे येवुन पाहणी केली असता कोणीतरी अज्ञात चोराने तिच्या घराचे समोरील दाराचे कुलुप तोडुन आत प्रवेश करुन १ सोन्याचा वजन १.५ ग्रॅम, डोरला वजन दीड ग्रॅम,सोन्याच्या कुळया ०३ जोड वजन ०५ ग्रॅम, ०१ सोण्याची नथ वजन दिड ग्रम, चांदीची चपलाकंठी वजन २० ग्रॅम, चांदीच्या तोरडया वजन ३० ग्रॅम व नगदी ५०००रु/—असा एकुण २६,४००रु/— चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी सौ. रिता श्रावण मरघडे वय ५० वर्ष, रा. शास्त्री वार्ड वरठी ह. मु. बीएसएनएल ऑफिस क्वार्टर नं. ०३ बसस्टॉप समोर भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गायकवाड पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे.

२) एसटी बस मधुन प्रवास करीत असतांना सोबत असलेल्या बॅग मधील नगदी पैश्याची व मोबाईची चोरी . :—

दिनांक ०६/०४/२०१७ चे ११.०० ते १२.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी सौ. मनीषा दिपक पडोळे वय २८ वर्ष, रा. मांढळ ही आपल्या मुला सोबत बसस्टॉप वर गोंदीया येथे जाण्या करीता अहेरी ते गोंदीया बसने प्रवास करीत असता साकोली बसस्टॉप येथे सदर बस रिपेरींग करीता डेपो मध्ये गेल्याने बस मधील प्रवासी खाली उतरले व दुस—या बस मध्ये बसत असतांना आपली बॅग पाहीली असता बॅग मधील लहान पर्स मध्ये ठेवलेले नगदी १०,०००/रु व मॅक्स कंपनीचा मोबाईल असा एकुण ११,५००/रु चा माल चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहे.

३) ट्रेलर चालकांच्या निष्काळजीपणाने चालवुन एसटी बस धडक मारुन बसचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक ०६/०४/२०१७ चे १५.४५ वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रेलर भरधाव वेगाने व निष्काळजीपने विरूध्द दिशेने चालवीत आणुन एसटी बस क्र. एमएच ४०/८१०९ ला मागील उजव्या बाजुस धडक मारून पिल्लर तुटुन तसेच मागील स्वॉप्टींग चेचीस ॲगल वाकुन व मागचा पत्रा फाटुन अंदाजे १०,०००/रु चे नुकसान केल्याने फिर्यादी चंद्रशेखर भाऊराव बांडेबुचे वय ३० वर्ष, रा. मोहगाव यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २७९,४२७ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोदनकर. पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहे

**४) ट्रॅव्हल चालकांच्या लापरवाहीने रोड ओलांडणाऱ्या पायी इसमांच्या मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०५/०४/२०१७ चे २०.१५ वा. दरम्यान यातील मो.सा. क्र. एमएच ३१ बीयु ९७८६ चा चालक मृतक भानुदास सुरेश टिचकुले वय ३७ वर्ष रा. लाखोरी हा पोहऱ्याकडे जाण्या करीता एनएच ०६ रोड ओलांडण्या करीता डिव्हायडर जवळ थांबला असता समोरून पोहरा रोड कडुन येणारी हरीष ट्रॅव्हलच्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन लापरवाहीने व हयगयीने रोड क्रॉस करतांना मो.सा. ला धडक मारून मृतकचे मरणास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता साकोली कडे पळुन गेल्याने फिर्यादी रामदयाल जयरामजी डोरले वय ६३ वर्ष, रा. मानेगाव सडक यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३०४(अ) भांदवि.सहकलम १८४,१३४(ब) मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. कुरील पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहे.

**५) अल्टो चालकांच्या लापरवाहीने वाहन रोडचे डिव्हायडर धडक देवुन वाहन पलटी होवुन दोघांचा मृत्यु. :—**

दिनांक ०५/०४/२०१७ चे १८.३० वा. दरम्यान यातील आरोपी मृतक वाहन चालकाने आपले ताब्यातील अल्टो गाडी ही भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन एनएच ६ रोडचे डिव्हायडर ला धडक मारून वाहन पलटी होऊन पुर्णपणे चेपकुन गाडी मध्ये प्रवास करीत असलेली स्त्री व आरोपी चालक यांना मार लागुन घटणास्थळी मरण पावल्याने फिर्यादी रवी ताराचंद वाकलकर वय ३५ वर्ष, रा. मुरमाडी सडक यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३०४(अ) भांदवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोनी. चकाटे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहे.

**६) ट्रेलर चालकांने उभ्या ट्रकला धडक दिल्याने वाहन पलटी होवुन एकास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०३/०४/२०१७ चे ०३.४५ वा. दरम्यान यातील ट्रक एमएच ३४/एबी ९७३२ हे नादुरुस्त अवस्थेमध्ये एनएच ०६ रोडचे बाजुला उभे ठेवले असतांनी यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील ट्रेलर भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन उभे असलेल्या ट्रकला गाढवे पेट्रोलपंप समोर बेला येथे धडक मारुन पलटी होण्यास व त्यामधील ड्रायव्हर दिनेशकुमार यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी दिनेशकुमार रामथिरोल पांडे वय ४५ वर्ष, रा. विक्रमपुर उत्तरप्रदेश ह. मु. पारडी नागपुर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३०४(अ) भांदवि. सहकलम १८४,१३४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे.

**७) घराचे समोरील दाराचे कुलुप तोडुन आत प्रवेश करुन सोन्याच्या साहित्याची चोरी . :—**

दिनांक ०६/०४/२०१७ चे ०८.४५ वा. ते १०.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी रायभान नारायण सेलोकर वय ४० वर्ष, रा. धुसाळा हा घराला कुलुप लावुन घरी हजर नसतांना कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन फिर्यादीच्या घराचे समोरील दाराचे कुलुप तोडुन आत प्रवेश करुन घरातील आलमारीत ठेवलेले ०१ सोन्याचा मंगळसुत्र वजन ०५ ग्रॅम, ०१ सोन्याची अंगठी वजन ०३ ग्रॅम, ०२ सोन्याच्या अंगठया वजन ०६ ग्रॅम, ०१ सोन्याची नथ वजन २.५ ग्रॅम, सोन्याचे टॉप्स ०२ नग असा एकुण १९,०००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ४५४,३८० भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. सोलंकी पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहे.

८) मोटार सायकलची चोरी.  :–

दिनांक २७/०२/२०१७ ते २८/०२/२०१७ चे २२.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी विनोद आत्माराम किरपान वय ४१ वर्ष, रा. सिव्हील वार्ड साकोली यांची पुरानी लाल रंगाची स्कुटी पेप क्र. एमएच ३६ बी २४६२ किमंती १५,०००/–रु. ही घराचे बाजुला टिनाचे शेड मध्ये ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेले होते वाहनाचा शोध घेत असता आज रोजी पोलीस कर्मचाऱ्या कडुन फिर्यादीस माहिती मिळाल्याने यातील दोन्ही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीची स्कुटी पेप ही चोरुन घेऊन गेल्याने फिर्यादी आज रोजी पो. स्टे ला येऊन लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. सोलंकी पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहे.

९) अवैध दारु अडयांवर धाडी .  :–

दिनांक०६/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो स्टे भंडारा, जवाहरनगर, तुमसर, सिहोरा आंधळगाव, साकोली, पवनी, अडयाळ व लाखांदुर येथे अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण **१३ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १०५ लिटर + २९० किलो सडवा + साहित्य, २८१** लिटर ९४५ देशी/विदेशी बिअर +१ झायलो [illegible]. असा एकुण किंमती ५८,६९,६५९ चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.